दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2024-2026
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● सोमवार दि.१५ जुलै २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक २५० ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

थोडक्यात

न्हावणकोंड धबधब्याकडे जाणाऱ्या मार्गावर दरड कोसळली

देवगड । पांडूशेठ साटम

देवगड तळवडे येथील प्रसिद्ध असलेल्या न्हावणकोंड या धबधब्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूची दरड कोसळल्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. तसेच अजूनही दरडीचा काही भाग कोसळण्याची संभावना असल्यामुळे या ठिकाणी काळजी घेण्यात आली असून सुरक्षेच्या दृष्टिकोनातून दोन होमगार्ड देखील या रस्त्याच्या ठिकाणी तैनात करण्यात आले आहेत. या ठिकाणी कोसळलेली दरड देवगड येथील ओमटेक असोसिएट आणि तळवडे सरपंच गोपाळ रुमडे यांनी दाखवलेली तत्परते मुळे ही दरड रस्त्यावरून बाजूला हटविण्यात आली असूनअपघात होऊ नये यासाठी सध्या तरी हा रस्ता मोठ्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. तसेच गेल्या वर्षी देखील या ठिकाणी दरड कोसळली होती. त्यामुळे नागरिकांनी या दरडींच्या ठिकाणच्या धबधब्याकडे जाणाऱ्या मार्गावर जाळी लावण्याची मागणी केली आहे. जेणेकरून भविष्यात अपघात घडणार नाही.

तेरेखोल नदीने इशारा पातळी ओलांडली

बांदा । वार्ताहर

रेड अलर्टच्या पार्श्वभूमी वर जिल्ह्यात रात्री पासूनच मुसळधार पाऊस सुरू आहे. या पार्श्वभूमीवर तेरेखोल नदीने इशारा पातळी ओलांडली असून नजीकच्या गावातील नागरिकांनी सतर्क रहावे, असा इशारा जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. कोणीही पुराच्या पाण्यातून किंवा पुलावरून वाहतूक करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

कोकण रेल्वे मार्गावर मातीचा ढिग, रेल्वेसेवा विस्कळीत

ओरोस । प्रतिनिधी

कोकण रेल्वेमार्गावर खेड-रोहा दरम्यान दिवाणखवटी आणि व्हिनेरे या ठिकाणी मातीचा ढिगारा कोसळल्यामुळे वाहतूक पुन्हा एकदा विस्कळीत झाली आहे. याबाबतची माहिती रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी सचिन देसाई यांनी दिली असून हा अडसर दूर करण्यासाठी रेल्वे प्रशासन सज्ज आहे. मात्र त्यासाठी दोन ते अडीच तासाचा कालावधी लागणार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

सिंधुदुर्गात जिल्ह्यात पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता ; नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्यास सुरुवात

सिंधुदुर्ग । जिल्हाप्रतिनिधी

शनिवारी मध्यरात्री पासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील महत्वाच्या नद्यांची पाणी पातळी वाढल्याने ग्रामीण भागात अनेक रस्ते पाण्याखाली गेले होते. परिणामी तेथील वाहतूक ठप्प झाली होती.ठिकठिकाणी शेती पाण्याखाली गेली होती. दुपार नंतर पावसाने उसंत घेतली होती. त्यानंतर सायंकाळी पावसाची रिपरिप सुरू होती.

शनिवारी मध्यरात्री पासून ते रविवारी दुपारी १२ वाजेपर्यंत जिल्ह्यात मुसळधार पाऊस चालू होता. या पावसाने जिल्ह्यातील सर्वच महत्वच्या नद्या पूर्णक्षमतेने पाहत होत्या. परिणामी अनेक गावांमध्ये पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली होती. गावातील अनेक ब्रीज वर पाणी आल्याने वाहतूक ठप्प झाली होती. कुंदे पूलावर पाणी आल्याने कसा ल, आंबड पोखरण कळसुली मार्गावरील वाहतूक बंद होती. घोडा वडे पुलावर पाणी आला रे या मार्गावरील वाहतूक पर्यायी मठ मार्गे वळविण्यात आली होती. कणकवली आचरा मार्गावर पाणी आल्याने या मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. गोठणे किर्लोस बंधाऱ्यावर गड नदीचे पाणी आल्याने

हा मार्ग वाहतुकीस बद होता परंतु किर्लोस ला जाण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होता.

आजच्या पावसाचा फटका ग्रामीण भागाला सर्वात जास्त बसला आहे. पुलावर पाणी आल्याने वाहतूक बंद पडली होती. परिणामी अनेक गावांचा संपर्क तुटला होता. शेती बराच वेळ पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांना याचा फटका बसू शकतो. दरम्यान पुढील ७२ तास पावसाचे असून या कालावधीतील मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

रविवारी सकाळी १० वाजेपर्यंत झालेला पाऊस..!

देवगड - ८९.४ मिमी, मालवण ८८.४ मिमी, सावंतवाडी १११.८, मिमी, वेंगुर्ला ९८ मिमी, कणकवली ९८.५ मिमी, कुडाळ ८८ मिमी, वैभववाडी ९६.४ मिमी, दोडामार्ग ८७.९ मिमी पाऊस पडल्याची नोंद प्रशासनाकडे प्राप्त झाली आहे.

जिल्ह्यात पावसाचा जोर पुन्हा वाढला असून (ता. १३) सकाळपासून जिल्ह्याच्या सर्व भागात जोरदार सरी पडत आहेत. त्यामुळे पडझडीच्या प्रकारात देखील वाढ झाली आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील तीन दिवस ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे. ७ जुलैला जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर जिल्ह्याच्या किनारपट्टी भागात पावसाचा जोर अधिक राहिला. परंतु उर्वरित जिल्ह्यात मात्र पावसाचे प्रमाण संमिश्र राहिले. गेले दोन दिवस पावसाने उघडीप दिली होती. परंतु काल सायंकाळनंतर पावसाचा जोर हळूहळू वाढू लागला.

जिल्ह्यातील वैभववाडी, कणकवली तालुक्यांत काल सायंकाळी उशिरा जोरदार सरी कोसळल्या होत्या. त्यानंतर रात्रभर जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडत होत्या. काही भागांत मुसळधार पाऊस देखील पडत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा पडझडीचे प्रकार सुरू झाले आहेत. कणकवली तालुक्यातील कळसुली येथील विनायक दळवी यांचे घर मुसळधार पावसामुळे कोसळले.

जिल्ह्यातील सावंतवाडी, मालवण, वेंगुर्ला, वैभववाडी, कुडाळ तालुक्यांत जोरदार पाऊस पडत आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास नद्यांच्या पाणीपातळीत अधिक वाढ होण्याची शक्यता आहे. जिल्ह्याच्या काही भागात पावसाने दोन- तीन दिवस उघडीप दिल्यामुळे भातरोपे पुनर्लागवड रखडली होती. परंतु काल सायंकाळपासून जिल्ह्यात दमदार पावसाला सुरुवात झाल्यामुळे भातरोप पुनर्लागवडीला देखील गती प्राप्त झाली आहे.

पुढील चार दिवस ऑरेंज अलर्ट

जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असताना हवामान विभागाने पुढील चार दिवस जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे. या कालावधीत जिल्ह्याच्या अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून समुद्रात प्रतिताशी ४५ ते ५५ किमी वेगाने वारे वाहणार आहेत. या कालावधीत समुद्रात कुणीही जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

कोकणात आज काही भागात पावसाचा

पान ३ वर...

मालवण बंदरात धोक्याचा बंदर विभागाकडून तीन नंबरचा बावटा

मालवण । वार्ताहर

प्रशासनाने आज जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट असताना काल शनिवारी रात्रीपासून ते आज दिवसभर मालवण तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपून काढले. या पावसामुळे तालुक्यातील अनेक ठिकाणी पाणी भरल्याने काही रस्ते पाण्याखाली गेले. यामुळे जनजीवन विस्कळीत बनले आहे. मुसळधार पावसामुळे समुद्रही खवळला असून मालवण बंदरात धोक्याचा तीन नंबरचा बावटा बंदर विभागाकडून लावण्यात आला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आज पावसाचा रेड अलर्ट जाहीर करण्यात आला होता. तर पुढील दोन दिवसासाठी ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मालवण तालुक्यात काल रात्री पासून पावसाने जोरदार सुरु केलेली बॅटिंग आज दिवसभर सुरु ठेवत मालवणला झोडपले. यामुळे मसुरे, काळसे आचरा याभागात पाणी भरले. तालुक्यातील बागायत मार्गावर पाणी आल्याने वाहतूक ठप्प झाली होती. वाहणाऱ्या पाण्याला मोठ्या प्रमाणात जोर असल्याने वाहने दोन्ही बाजूला थांबून होती. तर मालवण-आचरा मुख्य मार्गावर चिंदर येथे रस्त्यावर मोठया प्रमाणात पाणी आले. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला. गोठणे ते किर्लोसपर्यंत असणाऱ्या बंधाऱ्यावर पाणी चढल्याने हा मार्ग बंद झाला होता. देवबाग येथे कर्ली खाडी पात्राच्या पाण्यात वाढ झाल्याने खाडी किनाऱ्यालगत ठेवलेल्या छोट्या

पान ३ वर...

विशाळगड अतिक्रमण मुक्ती आंदोलनाला हिंसक वळण घरं, वाहनं आणि धार्मिक स्थळावर दगडफेक

कोल्हापूर । प्रतिनिधी

माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या विशाळगड अतिक्रमण मुक्ती आंदोलनाला आज हिंसक वळण लागलं. विशाळगडपासून काही अंतरावर असलेल्या गजापूर परिसरातील काही विशिष्ट समाजाची घरं, वाहनं आणि धार्मिक स्थळावर दगडफेक करण्यात आली. या दरम्यान एक घर देखील पेटवण्यात आलं. पोलीसांवर देखील तलवारीने हल्ला चढवण्यात आला होता. त्यामुळे

विशाळगडावर असणाऱ्या दर्ग्यामुळं या ठिकाणी पशुबळी दिले जातात. या गडावरील अतिक्रमणं हटवावीत, अशी आग्रही मागणी करत, माजी खासदार संभाजीराजे यांनी विशाळगड अतिक्रमण हटाव केलं असलं तरी त्यांचा खरा हेतू हा विशाळगड अतिक्रमण मुक्तीचा होता. आज सकाळी १० वाजता करवीर निवासिनी श्री अंबाबाई आणि तुळजाभवानी देवीचं दर्शन घेऊन, संभाजीराजे यांनी विशाळगडाकडं कूच केलं. दरम्यान, विशाळगडाच्या पायथ्याशी संभाजीराजे पोहचण्यापूर्वीच २ हजारपेक्षा अधिक कार्यकर्ते उपस्थित होते.

दुपारी १२ वाजण्याच्या सुमाराला, संभाजीराजे विशाळगडाच्या पायथ्याशी पोहचले. मात्र विशाळगडच्या पायथ्या शेजारी असलेल्या गजापूर इथल्या विशिष्ट समाजाच्या वस्तीवर संभाजीराजेंच्या कार्यकर्त्यांनी हल्ले चढवले. यावेळी कार्यकर्त्यांनी विशिष्ट समाजाच्या कुटुंबियांची घरं,

पान ३ वर...

परमे गावात मुसळधार पावसाने गावातील कॉजवे पाण्याखाली

परमे । वार्ताहर

दोडामार्ग तालुक्यात शनिवार पासून मुसळधार पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली आहे. ग्रामीण भागात देखील मोठा पाऊस पडत आहे. परमे गावात डोंगर परीसरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. यामुळे गावातील नाल्याला आलेल्या पाण्यामुळे गावातील कॉजवे पाण्याखाली गेले आहेत यामुळे काही तास गावातील ग्रामस्थ यांची मोठी



गैरसोय झाली. काही लाकडे वाहून येऊन कॉजवेवर अडकली

पान ३ वर...

साटेली भेडशी पुलाच्या जोड रस्त्यावर पाणी, दोडामार्ग बांधकाम विभाग सतर्क

दोडामार्ग । वार्ताहर

दोडामार्ग तालुक्यात गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरजन्य परस्थिती निर्माण झाली होती. साटेली भेडशी पुलाच्या जोड रस्त्यावर पाणी असताना बाजारपेठेत प्रशासन बांधकाम विभाग यांनी सूचना फलक न लावल्याने एक कार पाण्यात शिरून वाहुन गेली होती. स्थानिक ग्रामस्थ यांनी तिघांना वाचवले होते. याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी पडत

असलेल्या पावसामुळे साटेली भेडशी नदीला मोठ्या प्रमाणात पाणी येऊन जोड रस्त्यावर पाणी शिरले याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग दोडामार्ग याना मिळताच कनिष्ठ शाखा अभियंता संभाजी घंटे यांनी तातडीने साटेली भेडशी बाजारपेठ जुन्या रस्त्यावर

पान ३ वर...

पणजी ते घोटगेवाडी कदंबा बस मध्ये शॉटसर्कीट होऊन धुराचे लोट

पणजी । वार्ताहर

पणजी ते घोटगेवाडी येथे जाणारी कदंबा बस रविवारी सायंकाळी सात वाजता दोडामार्ग बाजारपेठ आली असता या बसच्या इंधन मधून अचानक धूराचे लोट बाहेर पडले यामुळे चालक वाहक प्रवासी यांची तारांबळ उडाली चालकाने लगेच बस बंद करून बॅटरी कनेक्शन काढून टाकले . चालकाच्या प्रसंगवधनामुळे कंदबा बस वाचली अन्यथा

पेट घेतला असता. नंतर ही बस एका बाजूला उभी करण्यात आली.

पणजी घोटगेवाडी कदंबा बस क्रमांक जी.ए.०३ एक्स ०२४२ ही नेहमी प्रमाणे प्रवासी घेऊन घोटगेवाडी येथे निघाली

पान ३ वर...

दोडामार्ग तहसीलला गळती !

दोडामार्ग । वार्ताहर

दोडामार्ग तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालय पाहिले तर बऱ्याच कार्यालयां मध्ये मोठ्या प्रमाणात गळती लागल चित्र दिसून आले आहे. तालुक्यातील गळती लागलेल्या शासकीय कार्यालयांचा आढावा घेतला त्यात शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, व आता तालुक्याचे मुख्यालय म्हणजे तहसील कार्यालयाला निदर्शनास आले आहे. तालुक्यातील शासकीय



इमारतीला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याचे चित्र दिसून आले. तीन ते चार वर्षांपूर्वी याच इमारतीला मोठ्या प्रमाणात गळती लागली होती. या पार्श्वभूमीवर तहसील इमारतीच्या छपरावर ३४ लाख उपस्थित होत आहे. येथील कार्यालयातील शौचालय पाहिले तर अक्षरशः दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. येथील कर्मचाऱ्यांना शौचालय असून देखील उघड्यावर शौचालयाला जाण्याची वेळ आली आहे. दोडामार्ग तालुका निर्मिती होऊन आज २५ वर्षे पूर्ण झाली आहेत आणि तालुक्यातील मुख्यालंय इमारतीची दुर्दशा पाहिली तर इमारत आज पडते की उद्या अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

तहसील कार्यालयात शौचालयाची दुर्गंधी !

दरम्यान तहसील कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी केल्यावर निदर्शनास आले की कार्यालयातील सर्व बाथरूम

पान ३ वर...

सिंधुदुर्ग जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन

अक्षरोत्सव परिवार आणि श्रावणी कंप्युटर एज्युकेशनचा उपक्रम

तळेरे । वार्ताहर

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळेरे येथील अक्षरोत्सव परिवार आणि श्रावणी कंप्युटर एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सिंधुदुर्ग जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धे चे हे यशस्वी चौथे वर्ष असून तीन गटात ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त शालेय मुलांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. मुलांना लेखनाची आणि सुंदर हस्ताक्षरची आवड निर्माण व्हावी यासाठी दरवर्षी जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन केले जाते. यावर्षी ही स्पर्धा १ ली ते ४ थी, ५ वी ते ८ वी व ९ वी ते १२ वी अशा तीन गटात होणार आहे. यासाठी सुप्रसिध्द कवी, अभिनेते आणि लेखक संकर्षण कऱ्हाडे यांच्या दोन कविता निवडण्यात आलेल्या आहेत. मुलांनी पुन्हा एकदा लेखनाकडे गांभिर्याने पहावे, हस्स्ताक्षर सुधारावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

स्पर्धेमागे दुहेरी हेतू

या स्पर्धेच्या माध्यमातून मुलांना लेखनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यातून सामाजिकता जोपासली जावी असा दुहेरी उद्देश ठेऊन स्पर्धेचे आयोजन केले जाते. त्यामुळे सामाजिक संदेश

पान ३ वर...

सिंधुदुर्ग समाचार

दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg. samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

सिंधुदुर्ग समाचार
॥ बुडती हे जण न देखवे डोळा! ॥

निवडणूक निकालांनी दाखवले संविधान आणि जनता सर्वोच्च!

सात राज्यांच्या पोटनिवडणुकीत भाजपच्या दारुण पराभवाने भाजपने निर्माण केलेले भीतीचे आणि संभ्रमाचे जाळे तुटले आहे.शेतकरी, तरुण, मजूर, व्यापारी आणि नोकरदार व्यावसायिकांसह प्रत्येक वर्गाला हुकूमशाहीचा संपूर्णपणे नाश करून न्यायाचे राज्य हवे आहे. जनतेने आपल्या जीवनाच्या भल्यासाठी आणि संविधानाच्या रक्षणासाठी इंडिया गठबंधन सोबत उभे रहाण्याचा निर्णय घेतला आहे. मुद्दा फक्त संविधानापुरताच मर्यादीत नाहीय. तर पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्ष १३ जागांपैकी ११ जागा हरली आहे. इथे मुद्दा हा आहे की बद्रीनाथमध्ये भारतीय जनता पक्षाने पोटनिवडणुकीत बद्रीनाथ मंदिरासंबंधी बरेच राजकारण केले, उत्तराखंडमध्ये मंदिराशी निगडीत राजकारण केले होते पण तिथल्या लोकांनी काँग्रेसवर विश्वास व्यक्त केलाय.

उत्तराखंडच्या दोन्ही जागांवर काँग्रेसचा विजय खूप काही सांगून जातो. ज्या बद्रीनाथमध्ये भारतीय जनता पक्षाने मंदिर आणि धार्मिक राजकारण केले होते, तिथे काँग्रेसचा उमेदवार विजयी होत आहे आणि नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत उत्तराखंडमध्ये काँग्रेसचा सूपड़ा साफ झाला होता, हे आपण विसरू शकत नाही विधानसभा आणि तीही बद्रीनाथमध्ये, म्हणजे अयोध्या, फैजाबादनंतर आता बद्रीनाथमध्ये जनतेने भारतीय जनता पक्षाला मोठी चपराक दिली आहे. फैजाबादमध्ये अयोध्येचे राजकारण कसे झाले ते आठवा. बद्रीनाथमध्ये त्याची पुनरावृत्ती झाली, पण बद्रीनाथच्या जनतेनेही काँग्रेसवर विश्वास व्यक्त केला आहे आणि हे विसरू नका, अर्थातच आपण बद्रीनाथबद्दल बोलत आहोत पण उत्तराखंड, मंगळुरूमध्ये आणखी एक जागा आहे, तिथेही काँग्रेस जिंकली आहे. आणि हा विजय का महत्त्वाचा आहे हे महत्वाचे आहे.

येथे मतदान होत असताना मंगळुरूमध्येही मोठ्या संख्येने मुस्लिमांना मतदान करण्यापासून रोखण्यात आले, तसेच वातावरण बिघडवण्यास कोणतीच कसर सोडली नाही येथे स्पष्टीकरण देण्याची गरज नाही आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बसपने मुस्लिम उमेदवार उभा केला आहे, काझी निजामुद्दीन हे काँग्रेसच्या बाजूने मैदानात होते, बसपाने उबैद उर रहमान यांना उभे केले होते आणि भाजपच्या बाजूने कर्तारसिंग बढ़ाना म्हणजेच बसपाने मुद्दाम मुस्लीम उमेदवार उभा केला जो काँग्रेसची मते कापत होता आणि मंगलरला जिंकण्यासाठी सर्वात आधी मोठ्या संख्येने मुस्लिमांना मतदान करण्यापासून रोखले गेले. दुसरी गोष्ट म्हणजे बसपाने मुस्लिम उमेदवार उभा केला, तरीही भाजपचा पराभव झाला.

त्यांनी उत्तराखंडमध्ये दोन्ही गोष्टी केल्या, त्यांनी बद्रिनाथमध्ये धर्माशी संबंधित राजकारण आणि मंगलोरम ध्ये सांप्रदायिक राजकारण केले. जातीयवादी राजकारण करूनही भाजपला विजय मिळवता आला नाही, मग सातून काय संदेश जातोय, जातीयवादाने लोकांचा संयम आता सुटत चालला आहे. विषारी राजकारण करून उपयोग नाही, हे आता लोकांना कळू लागले आहे. आणि सर्वात मोठी गोष्ट म्हणजे ज्या जालंधरमध्ये निवडणुका होत होत्या, तिथे आमआदमी पार्टीने ६० टक्क्यांहून अधिक विजय मिळवला आहे. आमआदमी पक्षाचे नेते संजय सिंह यांनी हा विजय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे वर्णन केले आहे.

आज पंजाबच्या जालंधर पश्चिमचा निकाल आला आहे, आमआदमी पक्षाचे उमेदवार महेंद्र भगतजी तिथून जवळपास ३८००० मतांनी विजयी झाले आहेत. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी त्यांच्या सर्व मंत्र्यांसह रात्रंदिवस प्रचार केला. आमदार आणि कार्यकर्ते एकत्र येऊन ही निवडणूक लढवली, हेच आम आदमी पार्टीचे सौंदर्य आहे, सर्वांनी मिळून आपल्या ध्येयासाठी काम केले आहे जालंधर पश्चिम विधानसभेच्या या निकालाने पंजाबमधील जनतेचा राज्य सरकारवर पूर्ण विश्वास असल्याचे सिद्ध केले आहे आणि या निकालाने हे स्पष्ट केले आहे की, इंडियाआघाडीबद्दल बोलायचे झाले तर या पोटनिवडणुकीत एकतर्फी इंडियाआघाडीला संपूर्ण देशाचा पाठिंबा मिळाला आहे.

संपूर्ण देशात कुठेतरी भारतीय जनता पक्षाने हे समजून घेतले पाहिजे की नुसती आश्वासने आणि खोटी विधाने करून चालणार नाही, तुम्हाला काहीतरी करावे लागेल, शेतकऱ्यांसाठी, तरुणांसाठी, अग्निवीर सारखी योजना रद्द करून, नोकरभरती पूर्ववत करूनच भाजपला यश मिळू शकणार आहे. बद्रीनाथमध्ये ज्या प्रकारे भाजपचा पराभव झाला आहे, हा संदेश भाजपासाठी खूप म हत्वाचा आहे. आधी अयोध्येत, आता बद्रीनाथ मध्ये भाजपचा पराभव हा प्रत्यक्ष पुरावा आहे की, या भोंदू लोकांचे स्वयंघोषित धर्माच्या अधीनतेचे दिवस संपले आहेत. येत्या दोन-तीन महिन्यांत महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंडमध्ये निवडणुका होणार आहेत, मित्रांनो, पोटनिवडणुकीत भाजपला पराभवाचा सामना करावा लागला आहे, त्याचा परिणाम येत्या काळात वेगवेगळ्या ठिकाणी कुठेतरी पाहायला मिळणार आहे. तीन महिने देईल. महाराष्ट्रातील इंडियाआघाडीला आत्मविश्वास आहे, पण, आपल्या आमदारांवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. कारण नुकत्याच झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेसच्या अनेक आमदारांनी क्रॉस व्होटींग केले होते, त्यामुळे इंडियाआघाडीचे नुकसान झाले होते आणि भाजपयुतीला फायदा. त्यामुळेच तुम्ही तयारी जरूर केलेली असेल, पण तुम्ही असे उमेदवार निवडा जे विजयानंतर भाजपच्या मांडीवर बसणार नाहीत.

नामाचा महिमा !

महाराष्ट्रभूमीला जसा शौर्याचा आणि पराक्रमाचा वारसा लाभला आहे तसा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ठेवाही लाभला आहे. महाराष्ट्राला साधू संतांची भूमी असे म्हटले जाते. वारकरी संप्रदाय हे महाराष्ट्राचे सर्वात मोठे भूषण आहे आणि आषाढी-कार्तिकी एकादशीनिमित्त केली जाणारी पंढरपूर वारी हा राज्यातील सर्वात मोठा महोत्सव असतो. आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. आपली सारी व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. या पायपिटी मध्ये तब्येतीची चिंता, खाण्या पिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. पांडुरंगाच्या आणि भक्ताच्या अतूट नात्याच्या मिलानोत्सवाला विज्ञानाचे तराजू तोलू शकेल का ?

वारकरी संप्रदायाने या महाराष्ट्राला अनेक संत दिले. विठुरायाच्या भक्तीत लिन होऊन या संतांनी साक्षात विठुरायाला प्रसन्न केले. विशेष म्हणजे जात पात यांच्या पलीकडे भक्ती असते याचा प्रत्यक्ष अनुभव विठुरायाने आपल्या भक्तांना दिला आहे. ज्या काळात स्पृश्य- अस्पृश्यता पाळली जात होती, गरीब श्रीमंती भेदाभेद होता त्याही काळात विविध जातीचे विठुरायाचे भक्त संतपदी विराजमान झाले आहेत. पिढीजात श्रीमंतापासून अत्यंत गरीबही आपल्या भक्तीच्या बळावर विठूम ाऊलीला प्रिय ठरला आहे. भगवंताच्या दरबारात जाती पातीला, गरीब श्रीमंती भेदभेदाला कवडीचीही किंमत नाही हेच भगवंताने या उदाहरणांतून दाखवून दिले आहे. विठुरायाच्या भक्तीमध्ये लिन होताना आलेल्या अनुभूती आणि मिळालेले ज्ञान या संत मंडळींनी अभंग, ओवी, गवळण आणि भारूड यांच्या माध्यमातून येणाऱ्या पिढीसाठी साध्या सरळ शब्दांत मांडून ठेवले. या संतांचे साहित्य वाचले कि अध्यात्म किती सोपे आहे याची जाण होते. या समस्त ज्ञानगंगेचे सार म्हणजे भगवंताचे नामस्मरण ! ज्ञानेश्वर माउली म्हणतात 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा श्र पुण्याची गणना कोण करी श्रश्र '.तर तुकोबाराय सांगतात 'नामसंकीर्तन साधन पै सोपे श्र जळतील पापे जन्मांतरीची श्रश्र' सर्वच संतांनी नामस्मरणाची महती त्यांच्या त्यांच्या शब्दात वर्णिली आहे. भगवंताच्या प्राप्तीचा सर्वात सुलभ मार्ग म्हणजे नामस्म रण. वारकऱ्यांना वारीमध्ये शेकडो मैलाचे अंतर चालण्याचे बळ देणारे माध्यम सुद्धा श्री विठ्ठलाचे नाम तर आहे. कलियुगातील हीच सर्वोत्तम साधना आहे, त्यामुळे संतांनी नाम ाचे महत्व जागोजागी अधोरेखित केले आहे. संत सावता माळी यांनी पंढरीला न जाताही नामाच्या बळावर श्री विठ्ठलाला प्रसन्न केले.

नामसाधना अशी साधना आहे जिला वेळेचे, स्थानाचे आणि काळाचे बंधन नाही. 'रामसे बडा रामका नाम' हे प्रत्यक्ष श्रीरामांनीही वानरसेनेच्या माध्यमातून साऱ्या जगाला दाखवून दिले. अर्जुनाचा अंतर्मनात श्रीकृष्णाचा जप अखंड चालू असे त्यामुळे त्याने सोडलेला बाण लक्ष्यभेद घेई. छत्रपती शिवाजी महाराज सदैव 'जगदंब जगदंब' असा जप करत ज्याच्या सामर्थ्यावर त्यांना पातशाह्यांविरुध्द लढण्यासाठी आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी अध्यात्मि क बळ मिळाले. नामस्मरणाचा महिमा आता विज्ञानाच्या पातळीवर सिद्ध झाला आहे. आत्मा आणि परमात्मा यांचे मिलन घडवून आणणारा दुवा म्हणजे नाम. चार युगाच्या कालखंडातील सध्या कलियुग सुरु आहे. कलियुगातील सामान्य जनावरील व्याप पाहता भगवंताने साधी सोपी नामसाधना सांगितली आहे. केवळ अखंड नामाने कोणीही भगवंताची प्राप्ती करू शकतो. परंतु कलियुगातील रज तमाचे प्रदूषण पाहता नामजपाची अखंडता साधने तितकेही सोपे नाही. त्यासाठी नामाच्या जोडीला सत्संग, सेवा, त्याग, प्रीती(निरपेक्ष प्रेम) यांचे महत्व भगवंताने सांगितले आहे. यांची जोड दिली तर हळूहळू नामाचा संस्कार अंतर्मनावर होऊ लागतो. नामाची अखंडता साधल्यावर चराचरात भगवंताचा वास असल्याची अनुभूती येते, मग भगवंताला भेटण्यासाठी कुठे अन्यत्र जाण्याची आवश्यकताच भासत नाही. भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत, ज्यामध्ये भगवंत स्वतः भक्ताकडे आला आहे, भगवंताने भक्ताची सेवा केल्याचीही कित्येक उदाहरणे आहेत. दरवर्षी राज्यातील अनेक ठिकाणी मंदिरांतून, मोठमोठ्या मैदानातून विविध महाराज आणि कीर्तनकार यांची कीर्तने, हरिनाम सप्ताह चालतात. या कार्यक्रमांना हजारोंची गर्दी असते. कीर्तन जरी भागवतावर अथवा रामायणावर असले तरी या सर्वाचे सार 'नाम' हेच असते.

या किर्तनांत लोक माना डोलावताना, लिन होताना दिसतात मात्र यांपैकी किती जण कीर्तनाचे सार म्हणजेच 'नाम' घेण्याचा प्रत्यक्षात प्रयत्न करतात. अध्यात्म हे कृतीचे शास्त्र आहे. श्रवणभक्तीला अध्यात्मात अल्प महत्व आहे, तर प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्व आहे. कीर्तनात येऊन 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा' म्हणत माना डोलवल्या आणि हरीचे नाम घेण्याचा प्रयत्नच केला नाही, तर देव कसा आपल्याला जवळ करेल ? त्यामुळे कीर्तन प्रवचन हे केवळ ज्ञानार्जनाचे माध्यम नसून कृतिला प्रवृत्त करण्याचे साधन आहे, घरी चित्रपट आणि सासू सूनांचे कार्यक्रम पाहत बसण्यापेक्षा कीर्तन प्रवचनांना जाणे नक्कीच श्रेष्ठ आहे; मात्र अध्यात्मात पुढे जायचे असेल, त्यातील आनंद मिळवायचा असेल, तर नामस्मरणाशिवाय पर्याय नाही. हरिपाठ हजारदा म्हटला आणि माऊलीने सांगितलेले हरी नाम घेतलेच नाही तर माउलींना तरी आवडणार आहे का ? नामस्मरण हा साधनेचा पाया आहे त्यामुळे अध्यात्माची गोडी चाखायची असेल तर नियमितपणे नामस्मरण करण्याला पर्याय नाही.

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

महावितरणच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत रत्नागिरी परिमंडळाचे डबल गेम प्रथम

रत्नागिरी । प्रतिनिधी

महावितरणच्या राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाट्यस्पर्धेत कोकण प्रादेशिक विभागाचे प्रतिनिधित्व करताना रत्नागिरी परिमंडळाच्या 'डबल गेम' ने सांघिक नाट्यनिर्मितीत प्रथम क्रमांकासह वैयक्तिक गटात पाच पारितोषिके पटकावली.

महावितरणचे संचालक (संचालन तथा मानव संसाधन) अरविंद भादीकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. नागपूरातील वसंतराव देशपांडे सभागृहात दोन दिवसीय नाट्यस्पर्धा पार पडली. सर्वो त्कृष्ट दिग्दर्शन : प्रथम - राजीव पुणेकर, अभिनय पुरुष : प्रथम - दुर्गेश जगताप, अभिनय स्त्री : प्रथम - श्रद्धा मुळये , नेपथ्य:द्वितीय -राजेंद्र जाधव, रंगभूषा व वेशभूषा : द्वितीय -राजश्री मोरे, उत्तेजनार्थ : अनुराधा गोखले अशी वैयक्तिक गटात पारितोषिके पटकावली. लक्ष्मीकांत आडिवरेकर, दिपक चांदणे, महेंद्र शिवलकर, दयानंद चव्हाण, पायल मुंडेकर या कलाकारांनी नाटकात भूमिका साकारल्या.

नाट्यसंघास तत्कालीन मुख्य अभियंता परेश भागवत व अधीक्षक अभियंता स्वप्निल काटकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यकारी अभियंता विशाल शिवतारे, कैलास लवेकर, दत्तात्रय साळी, बाळासाहेब मोहिते, अजितपालसिंह दिनोरे, नितीन पळसुलेदेसाई, राजश्री मोरे, अजित अस्वले, अनुराधा आंधनसरे, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) मिलिंद कानडे, प्रणाली विश्लेषक हर्षद आपटे यांच्यासह परिमंडळातील अधिकारी- कर्मचारी व विविध संघटना पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले.

संघव्यवस्थापनाची जबाबदारी सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) वैभव थोरात यांनी नेटाने पार पाडली. सुयोग्य व्यवस्थापन व सातत्यपूर्ण पाठपुरावा ठेवल्याने उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अप्पासाहेब पाटील यांची भूमि का नाट्य व क्रीडा स्पर्धेतील यशात मोलाची राहिली आहे.

विजेत्या संघाचे प्रभारी मुख्य अभियंता कल्पना पाटील, अधीक्षक अभियंता अशोक साळुंके (सिंधुदुर्ग), वैभव पाथोडे (रत्नागिरी) यांनी कौतुक केले आहे.

वहिवाट

आजी संगे बसलो होतो, आजी माऊलीत दंग !
सहज विचारले तिला, का ग, आयुष्यभर विठूसंग !!
स्मितहास्यासह तिचे पानावले डोळे, अन म्हणे !
आयुष्यभर नाही रे विठ्ठलच आयुष्य जगणे!!
मला नाही कळले, आजी जे म्हणाली !
डोक्यावरती हात फिरवून, वारीला चल म्हणाली !!

पृथ्वी पाटील, सावर्डे, चिपळूण

लाडकी बहीण योजना भविष्यात तग धरणार का ?

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सध्या चर्चेचा विषय बनली आहे. या योजनेवर आधारित विनोदी मिम्स आणि रिल्स इंटरनेटवर सध्या धुम ाकूळ घालत आहेत. योजनेसाठी अर्ज भरण्याकरिता दोन महिन्यांची मुदत देण्यात आली असली, तरी राज्यातील बहुतांश महिला वर्ग कागदपत्रांची जमवाजमव करण्यासाठी आतापासूनच धावपळ करताना दिसतो आहे. सेतू केंद्रांवर महिलांच्या रांगा लागलेल्या पाहायला मिळत आहेत. घरात बऱ्यापैकी मिळकत येणाऱ्या महिलाही याम ध्ये आघाडीवर आहेत. घरातील कोणतीही व्यक्ती आयकर भरणारी नसावी ही जरी या योजनेसाठी पात्रतेची अट असली तरी राज्यात आयकर चोरणाऱ्यांची कमतरता नाही.

एकूणच या योजनेसाठी आलेल्या अर्जातून पात्र महिलांच्या नावांची छाननी करताना सरकारचा कस लागणार हे निश्चित आहे. तिवडणुकीच्या तोंडावर सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या या योजनेची अंम लबजावणी भविष्यात किती काळ टिकेल हे येणाऱ्या काळातच कळणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नाही शिवाय या योजनेसाठी आरंभी निश्चित केलेल्या अटी ज्या सहजतेने शिथिल करण्यात आल्या ते पाहता ही योजना म्हणजे केवळ प्रचाराचा मुद्दा आहे की काय असाही संशय लोकांमध्ये निर्माण झाला आहे. या योजनेचे अर्ज भरण्यासाठी यापूर्वी दिलेली १५ दिवसांची मुदत वाढवून दोन महिने करण्यात आली आहे. २ महिन्यानंतर आलेल्या अर्जाची छाननी करण्यात येणार आहे, त्यातच निवडणूका जाहीर होऊन आचारसंहिता लागू होईल. महिलांना या योजनेचा लाभ हवा असेल, तर आम्हालाच निवडून देण्याचे आव्हान सध्याच्या सरकारम धील पक्षाकडून केले जाऊ शकते, किंबहुना यंदाच्या निवडणूक प्रचारात सरकारमधील पक्षांसाठी हाच महत्वाचा मुद्दा असू शकतो. या मुद्याच्या बळावर महिलांची मते आपल्याकडे वळवण्यात सदर पक्ष किती प्रमाणात यशस्वी होतात हे पाहणे मनोरंजक ठरणार आहे. त्यातूनही महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आलेच तर सदर योजना राबवताना सरकारच्या नाकी नऊ येणार आहेत हे निश्चित आहे. राज्याच्या १२ कोटी लोकसंख्येपैकी ६ कोटी महिला आहेत असे ग्राह्य धरल्यास त्यापैकी ५ कोटींनी या योजनेसाठी अर्ज केला आणि अर्जाच्या छाननीमधून यापैकी ५० टक्के अर्ज अपात्र ठरले तरी पात्र ठरलेल्या अडीच कोटी महिलांना सरकारला प्रतिमाह १५०० रुपये द्यावे लागणार आहेत ज्यामुळे दर महिन्याला राज्याच्या तिजोरीवर तीन हजार सातशे पन्नास कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. वर्षाला ४५ हजार कोटी रुपये केवळ या एका योजनेसाठी सरकारला राखीव ठेवावे लागणार आहे. राज्याचे एकूण उत्पन्न पाहता केवळ एकाच योजनेसाठी एव्हढा पैसा खर्च केल्यावर अन्य योजना कशा राबवायच्या हा यक्षप्रश्न सरकारसमोर असेल, ज्यामुळे काही महिन्यांतच ही योजना गुंडाळण्याशिवाय सरकारला पर्याय नसेल. ही योजना बंद झाल्यास सरकार कसे महिलाविरोधी आहे सांगत विरोधी पक्ष सरकारवर तुटून पडेल ज्यामुळे सरकार कोसळण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. याआधीच राज्यावर ७ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. ही एक योजना राबवायची म्हणजे सरकारला आणखी कर्ज काढावे लागेल जे राज्याच्या भवितव्यासाठी नक्कीच घातक ठरू शकते. सध्याचे सरकार जरी भविष्यात सत्तेवर आले तरी माझी लाडकी बहीण योजना राबवणे आणि टिकवणे या सरकारलाही निश्चितच जड जाऊ शकते. सरकार कोणतेही असो या योजनेची शिथिल करण्यात आलेल्या अटींसह अंमलबजावणी करायची असेल, तर ही योजना फार काळ टिकणार नाही हे निश्चित आहे. योजना भविष्यात चालू ठेवायची असेल तर आता शिथिल केलेल्या अटी सरकारला एकतर पुन्हा लागू कराव्या लागणार आहेत किंवा ही योजनाच गुंडाळावी लागणार आहे, त्यामुळे आता लाडकी बहीण योजनेसाठी उत्साहाने अर्ज भरणाऱ्या महिलांची येणाऱ्या काळात घोर निराशा होऊ शकते असे मत जाणकार व्यक्त करत आहेत.

सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी

मुंबईकरांची लूट !

मुंबईत रविवारी रात्रभर पडलेल्या पावसाने मुंबईकरांची पूर्ती दैना झाली. लोकल रेल्वेसह रस्तेवाहतुकीवरही परिणाम झाल्याने चाकरमनी मिळेल त्या वाहनाने कामाचे ठिकाण गाठत होते. रविवारी मुंबईत नातेवाईकांकडे मुक्कामी आलेल्यांचे सोमवारी सकाळी निघताना हाल झाले. सकाळच्या सत्रात शाळांना सुट्टी देण्यात आली होती. खूपच आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले असले, तरी हातावर पोट असणाऱ्या खासगी कर्मचाऱ्यांना कामावर जाणे अपरिहार्य होते. पहाटे थांबलेल्या लोकल गाड्या सकाळी सात नंतर पाऊस ओसरल्यावर धीम्या गतीने सुरु झाल्या तरी रेल्वे स्थानकांवर आधीच प्रवासी खोळंबले असल्याने रेल्वे गाड्या भरभरून वहात होत्या. रस्त्यावर पाणी साचल्याने बेस्ट प्रशासनानेही सावधगिरीने बसगाड्या आगाराबाहेर काढल्या. ओला उबेरच्या गाड्या सुद्धा उपलब्ध होत नव्हता. अशावेळी

जनसंवाद

कालीपिली टॅक्सी आणि रिक्षाचाच मुंबईकरांना आधार होता. मुंबईकरांवर प्रतिकूल परिस्थिती ओढवल्याने त्याचा गैरफायदा काही रिक्षा आणि टॅक्सी चालक सर्रासपणे घेताना दिसत होते. मीटर बंद करून जवळच्या अंतरासाठीही अव्वाच्या सव्वा भाडी आकारत होते. अन्य काही पर्याय नसल्याने अनेक जण ही लूट निमूटपणे सहन करत होते. पावसाच्या दिवसांत सार्वजनिक वाहतूक कोलमडल्यावर मुंबई ठाणेसारख्या शहरांत रिक्षा आणि टॅक्सी चालक असहाय्य प्रवाशांना बिनधास्तपणे लुटायला सुरुवात करतात. सकाळी कामावर आणि सायंकाळी घरी वेळेत पोहोचणे हेच उद्दिष्ट असल्याने आणि यांच्याविरोधात तक्रार करायची तर त्याम ध्ये वेळ वाया जाणार यासाठी ही लूट मुंबईकर प्रत्येक वेळेस सहन करतात. या लुटीवर चाप बसण्यासाठी पोलीस प्रशासन काही करणार आहे की नाही ?

जगन घाणेकर, घाटकोपर

एक विचार !

अनेक महामार्गावरील विभाजकाच्या जागेत बऱ्याचदा कागदी फुले लावलेली आढळून येतात. वेळोवेळी त्यांची छाटणी केली, त्यांना आकार दिला गेला तर ती दिसतातही मोहक मात्र त्यांना काटे भयंकर, मजबूत असतात. कागदी फुलांचे झाड किंवा झुडूप जेवढं जुनं तेवढा त्याचा बुंधा आणि काटे मजबूत, बळकट असतात. दुर्दैवाने अपघात घडल्यास अपघातग्रस्तांना हे काटेच अधिक मारक ठरतात, त्रासदायक होतात, अधिक इजा पोहचविण्यास मदत करतात हे नाकारता येत नाही. आणि म्हणूनच एक विचार आला की कागदी फुलांसारखी (बोगन वेल वगैरे) काटेरी झाडे, झुडपे शक्यतो महामार्गावरील विभाजकांमध्ये न लावता बिना काटेरी, शारीरिक इजा न करणारी झाडे लावली जावीत.

विश्वनाथ पंडित, ठाणे

हिंदुत्वविषयक विचारांचा लाभ घेण्याची संधी !

हल्ली कोणीही उठतो आणि हिंदूंच्या देवी देवदेवतांची, श्रद्धास्थानांची स्टँडअप कॉमेडीच्या नावाखाली टिंगलटवाळी करतो. समोर बसलेला बहुसंख्य हिंदू समाज या थिल्लर विनोदांना पोट धरून हसून प्रतिसाद देतो. देवी देवता ही हिंदूंची बलस्थाने आहेत तो काही टिंगल टवाळीचा विषय नाही. आपल्या आईवडिलांची अशाप्रकारे भर कार्यक्रमात कुणी टिंगल केली तर आपण खपवून घेणार आहोत का ? मग देवतांची टिंगल होत असताना आपल्याला हसू तरी कसे येते. गेल्या काही वर्षांत करियरच्या नावाखाली आईवडिलांनी नोकरी करून बक्कळ पैसे कमावणे आणि आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंट शाळांत घालून त्यांच्या देखभालीची जबाबदारी पगारी नोकरांवर टाकण्याची प्रथा बळावत चालली आहे. त्यामुळे सायंकाळची शुभंकरोती, आजीच्या गोष्टी, अंगाई गीते हे सर्व हळूहळू लुप्त होत चालले आहे. परिणामी मुलांना आपल्या धर्माविषयीचे ज्ञान कुठेच मिळत नाही, त्यामुळे देवी देवता, संत महापुरुष यांच्याविषयी त्यांना तिळमात्र आदर नसतो. अन्य धर्मीय ज्याप्रमाणे आपल्या श्रद्धास्थानाबाबत जागृत असतात तसे हिंदू धर्मीय नसतात याचे कारण हिंदू धर्मीयांमध्ये असलेला धर्मशिक्षणाचा अभाव. देशभरातील कानोकोपऱ्यात तर विदेशातही कार्यरत असलेल्या हिंदू जनजागृती समितीच्या वतीने गेल्या काही वर्षांपासून गोव्यात अखिल भारतीय हिंदू अधिवेशनाचे आयोजन करण्यात येत आहे. या अधिवेशनात समस्त जगभरातून हिंदत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी, वक्ते, संत, मान्यवर उपस्थित राहून आपल्या ओघवत्या शैलीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतात. यंदा हे अधिवेशन २४ जूनपासून गोव्यात होत असल्याचे वाचनात आले. त्यामुळे अधिकाधिक हिंदू जनतेला मान्यवरांचे धर्माविषयीचे ज्ञान ऐकण्याची संधी मिळणार आहे. याचा अधिकाधिक हिंदूंनी लाभ घेऊन आपल्या धर्माची महानता जाणून घ्यावी !

- नरेश घरत, चेंबूर

दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग) : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : ॲड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, कोपार्डे, जि.कोल्हापूर महाराष्ट्र-४१६२०४, येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पाटमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

पान १ वरून

सिंधुदुर्गात जिल्ह्यात पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता; नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्यास सुरुवात

रेड अलर्ट हवामान विभागाने दिला होता. त्यानुसार सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्हात सकाळपासून पावसाची संततधार सुरु आहे. अनेक सखल भागात पाणी साचलं आहे. तर नद्यांच्या पाणीपातळीतही वाढ झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे वेंगुर्ला होडावडे तळवडे पुलावर पाणी आले आहे. त्यामुळे पर्यायी वेंगुर्ले मठ मार्गाने वाहतूक वळवण्यात आली आहे. कसाल, आंब्रड पोखरण, कळसुली, मार्गावर कुंदे येथे पुलावर पाणी आल्याने कसाल कळसुली मार्गावरील वाहतूक बंद झाली. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

रत्नागिरीत जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली

मुसळधार पावसामुळे जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. जगबुडी नदीची धोका पातळी ७ मीटर आहे. मात्र ही जगबुडी नदीने ही धोका पातळी ओलांडली असून सध्या जगबुडी नदी ८ मीटरवर वाहत आहे. त्यामुळे खेडमध्ये काही लोकांच्या घरापर्यंत पाणी आलं आहे. प्रशासन देखील सतर्क झालं आहे. नागरीकांनी व व्यापारी बंधूंनी शक्यतो कामाशिवाय घराबाहेर पडू नये. तसेच सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी व दक्षता घ्यावी, असं आवाहन करण्यात येत आहे. खेड मटण मार्केट परिसरात देखील जगबुडी नदीचं पाणी शिरलं आहे. नगरपरिषदेकडून नागरिकांना खबरदारीच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. तीन तासांपासून खेडमध्ये मुसळधार कोसळत आहे. नारंगी नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. नारंगी नदीचं पाणी वाढल्याने खेड-दापोली मार्गावरची वाहतूक बंद होण्याची शक्यता आहे. शेकडो हेक्टर शेती देखील पाण्याखाली गेली आहे.

मुंबई-पुणे एक्सप्रेस वे येथून पालीमार्गे कोकणात जाणाऱ्या खोपोली-पाली-वाकण मार्गांवर पुराचे पाणी आले आहे. खोपोली-पाली-वाकण फाटा महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. संततधार पावसाने आंबा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. आंबा नदीवरील पुलाच्या दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी साचल्याने पुलाच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

पातळगंगा नदी इशारा पातळीवर

रायगडमधील पातळगंगा नदी देखील इशारा पातळीवर आहे. खोपोलीत काही ठिकाणी पाणी साचले असून लौजी परिसरात गुडघाभर पाणी आहे. अनेक घरात देखील पाणी शिरले आहे.

मालवण बंदरात धोक्याचा बंदर विभागाकडून तीन नंबरचा बावटा

होड्या खाडी पात्रात तरंगत होत्या. अतिवृष्टीमूळे आचरा - कुंभारवाडी येथील मोतीराम अनंत पारकर यांच्या घरावर जांभळाचे झाड कोसळून छप्पराचे नुकसान झाले. मालवण शहरातही पावसाने मुसळधार हजेरी लावल्याने अनेक सखल भागात पाणी भरले. काही ठिकाणी घरांना पाण्याने वेढा दिला. तर काही रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते.

अतिवृष्टीमुळे समुद्र देखील खवळला आहे. समुद्राला उधाण असल्याने मालवण बंदरात तीन नंबरचा वादळी बावटा लावण्यात आला आहे. पावसासोबत वाऱ्यांचा वेगही वाढणार आहे. त्यामुळे मच्छिमार व नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असेही आवाहन बंदर विभागाकडून करण्यात आले आहे.

विशाळगड अतिक्रमण मुक्ती आंदोलनाला हिंसक वळण, घरं, वाहनं आणि धार्मिक स्थळावर दगडफेक

दुकानं, वाहनं यांना टार्गेट केलं. सर्व ठिकाणी कार्यकर्त्यांनी तुफान दगडफेक करत, मालमत्तांचं नुकसान केलं. दर्गा, कब्रस्थान, डोली यांची तोडफोड करून ५ ते ६ चारचाकी वाहनं आणि ८ ते १० दुचाकींचं नुकसान केलं. तर एका घराला आग लावल्यानं, घरातील चार सिलिंडरचा स्फोट होऊन घर आगीच्या भक्षस्थानी पडलं होतं. दुसरीकडं विशाळगडावरील दर्गा परिसरातही कार्यकर्त्यांनी तुफान दगडफेक करत घरं, दुकानं आणि धार्मिक स्थळाला लक्ष्य केलं. त्यामध्ये काही तरूण आणि लहान मुलं जखमी झाली होती. कार्यकर्त्यांचा जमाव बेफाम आणि बेकाबू झाला होता. त्यामुळं पोलीसही हतबल झाले होते.

परमे गावात मुसळधार पावसाने गावातील कॉजवे पाण्याखाली

ती राजेंद्र उसपकर इतरांनी बाजूला केली. दोडामार्ग तालुक्यात शनिवार सुरू झालेल्या मुसळधार पावसाने रविवारी झोडपून काढले यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. परमे गावातील डोंगर परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला यामुळे गावातील नदी नाल्याला मोठ्या प्रमाणात पाणी आले. या पाण्यामुळे गावातील रस्त्यावर असलेले कॉजवे पाण्याखाली गेले यामुळे दुचाकी वाहने नेणे अवघड झाले. काही तास प्रतिक्षा करावी लागली.

साटेली भेडशी पुलाच्या जोड रस्त्यावर पाणी, दोडामार्ग बांधकाम विभाग सतर्क

बॅरिकेड्स लावून संभाव्य धोका टाळण्यासाठी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली. दोडामार्ग तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून पाऊस सुरू झाला आहे. मुसळधार पावसामुळे पुन्हा नदी नाले ओढे पाणी पातळीत वाढ झाली आहे. असे असताना साटेली भेडशी येथील नदीवर कोट्यवधी रुपये खर्च करून पुल बांधून देखील याचा काही उपयोग झाला नाही पावसाळ्यात पुराचे पाणी रस्त्यावर येऊन वाहतूक बंद होण्याची तिसरी वेळ आहे. साटेली भेडशी येथील नदीला मोठ्या प्रमाणात रविवारी पाणी आले. हे पाणी रस्त्यावर येऊ लागले.

सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापन यांना कल्पना दिली. या नंतर सार्वजनिक बांधकाम विभाग कनिष्ठ अभियंता संभाजी घंटे यांनी इतर कर्मचारी घेऊन गेल्या आठवड्यात घटना घडली याची पुनरावृत्ती होऊ नये गाड्या पाण्यात अडकूनये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून जोड रस्त्यावर तसेच बाजारपेठ मध्ये सुरक्षेतेच्या दृष्टीने बॅरिकेड्स लावून वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली बांधकाम विभाग यांच्या दक्षतेबात नागरिक वाहन धारकांनी समाधान व्यक्त केले.

पणजी ते घोटगेवाडी कदंबा बस मध्ये शॉटसर्कीट होऊन धुराचे लोट

होती. रविवारी असल्याने प्रवासी कमी होते. सायंकाळी सात वाजता बस दोडामार्ग बाजारपेठेत प्रवासी घेण्यासाठी उभी केली असता अचानक डायव्हर केबिन इंजिन मधून धुराचे लोट होऊन शॉटसर्कीट होऊन वायर जळाल्याचा वास आला. यावेळी बस मधिल प्रवासी तातडीने खाली उतरले कंदबा बस चालकाने बस बंद करून खाली उतरून बॅटरी कनेक्शन तोडले यामुळे मोठा अनर्थ टळला.

शास्त्रज्ञांनी विकसित केले डासांपासून संरक्षण करणारे भारताचे पहिले स्वदेशी विकसित मॉलिक्युल, बेकायदेशीर चिनी विकसित मॉलिक्युलवर मात

मुंबई । प्रतिनिधी

डासांपासून होणाऱ्या आजारांविरुद्धच्या लढाईत भारताने वैज्ञानिकदृष्ट्या महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड (जीसीपीएल) मधील शास्त्रज्ञांनी त्यांच्या भागीदारासह, ङ्करेनोफ्लुथ्रीनङ्क हे मॉलिक्युल अर्थात रेणू विकसित केले आहे. हे भारतातील पहिले स्वदेशी विकसित आणि पेटंट केलेले मॉलिक्युल (रेणू) जे डासांच्या नियंत्रणासाठी सर्वात प्रभावी द्रव वाष्प फॉर्म्युलेशन बनवते.

भारतात सध्या उपलब्ध असलेल्या लिक्विड व्हेपोरायझर फॉरमॅटमधील इतर कोणत्याही नोंदणीकृत फॉर्म्युलेशनच्या तुलनेत रेनोफ्लुथ्रीनने बनविलेले फॉर्म्युलेशन डासांच्या विरुद्ध दुप्पट अधिक प्रभावी आहे. केंद्रीय कीटकनाशक मंडळ आणि नोंदणी समिती (उखइठउ)द्वारे काटेकोर चाचणी आणि मान्यता त्याचा प्रभावीपणा व सुरक्षितता अधोरेखित करते. जीसीपीएल ही घरगुती कीटकनाशकांच्या श्रेणीमध्ये अग्रेसर आहे. कंपनी नवीन गुडनाइट फ्लॅश लिक्विड व्हेपोरायझरमध्ये रेनोफ्लुथ्रिन फॉर्म्युलेशन सादर करत आहे, जे भारतातील सर्वात प्रभावी लिक्विड व्हेपोरायझर आहे.

प्रत्येक दशकात किंवा नंतर डासांविरुद्ध कार्यक्षमता वाढविण्यासाठी नवीन मॉलिक्युल फॉर्म्युलेशन आवश्यक आहे. शेवटच्या कल्पकतेपासून १५ वर्षांहून अधिक काळ भारतातील बरेच लोक अत्यंत वाईट त्रासदायक स्वरूप जसे की, धूपकाड्यांकडे वळले, जे नोंदणीकृत नसलेले आणि अवैध चिनी विकसित मॉलिक्युल वापरतात. यामुळे विविध माध्यमांतून नोंदणी नसलेल्या आणि बेकायदेशीर चिनी विकसित रेपेलेंट मॉलिक्युलचा भारतात ओघ सुरू झाला आहे.

जीसीपीएलने नेहमीच सुरक्षित आणि प्रभावी नवीन मॉलिक्युल फॉर्म्युलेशन लॉंच करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. अशा प्रकारे जीसीपीएल आणि कंपनीच्या भागीदाराने ङ्करेनोफ्लुथ्रिनङ्क आणि त्याचे फॉर्म्युलेशन विकसित करण्यासाठी १० वर्षांहून अधिक काळ संशोधन व विकासामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली. भागीदाराद्वारे पेटंट केलेले, जीसीपीएलकडे भारतातील या मॉलिक्युलचा मध्यम कालावधीपर्यंत वापर करण्याचे विशेष अधिकार आहेत.

मॉलिक्युल(रेणू)च्या प्रगतीवर भाष्य करताना, गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडचे (जीसीपीएल) एमडी आणि सीईओ सुधीर सीतापती म्हणाले, १२७ वर्षांच्या वारशासह गोदरेजने भारतात अनेक स्वदेशी नवकल्पना सादर केल्या आहेत. विशेष म्हणजे, आम्ही विविध माध्यमांतून भारतात प्रवेश करणारे अनोंदणीकृत आणि बेकायदेशीर चिनी मॉलिक्युल असलेल्या डासांपासून बचाव करणाऱ्या अगरबत्तीसारख्या औषधांचा मोठ्या प्रमाणावर वापर पाहिला आहे.

रेनोफ्लुथ्रीन हे भारतातील पहिले स्वदेशी विकसित मच्छर प्रतिबंधक मॉलिक्युल आहे, जे लोकांना अवैध मॉलिक्युल असलेली उत्पादने वापरण्यापासून परावृत्त करेल. हा नवोपक्रम भारताला स्वावलंबी बनवतो, कारण आता आपल्याला आंतरराष्ट्रीय बाजारातून मॉलिक्युल आयात करण्याची गरज नाही. रेनोफ्लुथ्रीन नाफिलीस, एडीज आणि क्युलेक्स यांसारख्या सर्वत्र वावरणाऱ्या डासांच्या प्रजातींविरुद्ध प्रभावी आहे.

प्रख्यात विकासात्मक बालरोगतज्ज्ञ आणि इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्सचे (आयएपी) ज्येष्ठ सदस्य डॉ.समीर दलवाई म्हणाले, डासांमुळे होणारे मलेरिया आणि डेंग्यूसारखे आजार केवळ गंभीर आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरत नाहीत, तर आर्थिक भारही टाकतात. त्यामुळे डासांपासून अत्यंत प्रभावी संरक्षण असणे अत्यावश्यक आहे. या आजारांचा सामना करण्यासाठी उपाय सांगताना, मी सुरक्षा आणि दीर्घकालीन विश्वासार्हतेसह परिणामकारकतेला प्राधान्य देतो. मलेरिया आणि डेंग्यूसाठी जबाबदार असलेल्या डासांच्या प्रजातींना लक्ष्य करून, डासांमुळे होणाऱ्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास रेनोफ्लुथ्रीन मदत करेल. डासांची संख्या कमी करण्यासाठी प्रभावी आहे. आजारांचे संक्रमण कमी करण्यासाठी हे एक शक्तिशाली साधन आहे.

गुडनाइटच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की, ६३% भारतीय लोक त्यांच्या कुटुंबाचे डासांपासून संरक्षण करण्यासाठी लिक्विड व्हॅपोरायझर्सना प्राधान्य देतात. जीसीपीएल गुडनाइट फ्लॅश लिक्विड व्हॅपोराइजरमध्ये रेनोफ्लुथ्रीन हा क्रांतिकारक मॉलिक्युल सादर करत आहे. नवीन लिक्विड व्हेपोरायझर डासांना दुप्पट वेगाने दूर करेल आणि बंद केल्यानंतरही २ तास काम करेल.

सुधीर सीतापती पुढे म्हणाले की, जीसीपीएलला हे पेटंट केलेले रेनोफ्लुथ्रीन मॉलिक्युल मध्यम कालावधीत वापरण्यासाठी तयार आहे. यामुळे बाजारात उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही फॉर्म्युलेशनपेक्षा गुडनाइट फ्लॅश लिक्विड व्हेपोरायझर फॉर्म्युलेशन दुप्पट अधिक प्रभावी बनते. रेनोफ्लुथ्रीन सध्या भारतात असेल, आम्ही जिथे काम करतो, त्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये या मॉलिक्युलच्या मोठ्या क्षमतेचा आम्हाला अंदाज आहे.

संपूर्ण पॅकसाठी गुडनाइट फ्लॅशची किंमत सुमारे खछ्ठ १०० इतकी आहे (रिफिल + व्हेपोरायझर मशिन), रिफिल प्रत्येकी फक्त खछ्ठ ८५ मध्ये उपलब्ध आहे, जे देशभरातील लहान नागरी शहरे, शहरे आणि ग्रामीण भागात ग्राहकांना सेवा देतात.

दोडामार्ग तहसीलला गळती !

पान १ वरून..

व शौचालयात दुर्गंधीचे साम्राज्य दिसून आले. येथील बाथरूम वं शौचालय जाण्यासाठी लायक नाही. येथील अधिकारी कर्मचारी यांना उघड्यावर जावे लागत आहे. मग महिला वर्गाने काय करायचे असं येथील महिला कर्मचारी वर्गाकडून विचारलं जातं आहे.

दर्शनी भागात पाण्याची डबके

तहसील कार्यालय व पोलीस ठाणे हे या एकाच मुख्यालंय इमारत मध्ये आहे. या इमारतीच्या दर्शनी भागात प्रवेश करताना ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचून मोठी डबकी तयार झाली आहेत. या डबक्यामधून या ठिकाणी सर्व नागरिकांना त्रास सहन करून यावे लागत आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत आल्याने येथील नागरिकांनी नाराजी व्यक्ती केली आहे.

सार्वजनिक बांधकामला सोयरसुतक नाही

तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयी पाहिली वं त्यांच्या दुरुस्ती संदर्भात येथील अधुकारी यांच्या प्रतिक्रिया घेतल्या त्यावेळी त्यांच्याकडून सांगण्यात आले की या कार्यालयांच्या देखभाल दुरुस्ती वं लागलेली गळती या संदर्भात प्रत्येक कार्यालयाकडून पत्रव्यवहार झालेला आहे. मात्र त्या पत्राला बांधकाम विभागाकडून कोणतेच उत्तर मिळाले नाही. आणि २ ते ३ वर्षापासून कोणतीही दुरुस्ती झालेली नाही हे सांगण्यात आले. गळती लागलेल्या शासकीय कार्यालयाना भेट दिली. त्यावेळी येथील कर्मचाऱ्यांच्या भावना ऐकायला आल्यात की आम्ही अशा गळक्या इमारतीम ध्येच काम करायचं काय? असा प्रत्यक्ष सवाल त्यांनी मीडियाद्वारे उपस्थित केला आहे. आणि काम करीत असताना कोणतीही जीवितहानी घडल्यास त्याला जबाबदार कोण? असाही प्रश्न उपस्थित केला.

सिंधुदुर्ग जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन

पान १ वरून..

मिळेल असे साहित्य लेखनासाठी दिले जाते. यावेळच्या दोन्हीही कविता त्यात्या वयाच्या मुलांना वास्तव दर्शविणाऱ्या आहेत. स्पर्धकांनी आपले साहित्य ए४ कागदवर लिहून त्यामागे स्पर्धकाचे पूर्ण नाव, पत्ता, शाळेचे पूर्ण नाव, इयत्ता, संपर्क क्रमांक लिहून दि. १५ जुलै पर्यंत निकेत पावसकर, अक्षरोत्सव, तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे किंवा श्रावणी कंप्युटर एज्युकेशन, प्रज्ञांगण, महालक्ष्मी प्लाझा, खमंग हॉटेलजवळ, तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे आणून द्यावेत किंवा पोस्टाने पाठवायचे आहे.

या तिनही गटातील प्रथम तीन विजेत्यांना आकर्षक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात येईल. या स्पर्धेला उत्तम सुलेखन करणारे परीक्षक असतात.

तसेच, यापूर्वी झालेल्या स्पर्धेतील काही विजेत्यांनी अद्याप आपली पारितोषिके घेऊन गेलेली नाहीत, अशा स्पर्धकांनी अवश्य संपर्क साधावा. या स्पर्धेबाबत अधिक माहिती आणि स्पर्धेच्या कवितांसाठी निकेत पावसकर ९४०३१२०१५६, श्रावणी मदभावे ७७१९८५८३८७ किंवा सतिश मदभावे ९४०५९२८८६५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

माणगाव ग्रामपंचायत रस्त्याचा अतिक्रमणाचा मुद्दा विधानसभेत गाजला

मुंबई । प्रतिनिधी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्याच्या माणगाव ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावर एका व्यावसायिकाने केलेल्या अतिक्रमणाचा मुद्दा विधानसभेत गाजला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रश्नोत्तरच्या तासात घेऊन सरकारला चांगलेच धारेवर धरले.

जयंत पाटील या अतिक्रमणावर बोलताना म्हणाले की, माणगाव ग्रामपंचायतचा हा रस्ता फार जुना असून त्यावर अतिक्रमण करून एका व्यावसायिकाने बांधकाम केले आहे. या अनाधिकृत बांधकामामुळे लोकांची प्रचंड गैरसोय होत आहे हे सांगताना राज्यभरात असे प्रकार घडत असल्याचेही त्यांनी नमूद केले. धनदांडगे लोक आपली हुकुमशाही दाखवून असे प्रकार करतात. दमदाटी केली की त्यांवर प्रशासनामार्फत कोणतीही कारवाई होत नाही, गरीब जनतेच्या अडचणींकडे मात्र दुर्लक्ष करण्यात येते. यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी जयंत पाटील यांनी केली. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन रस्ता नियमाप्रमाणे वाहतुकीस उपलब्ध करून दिला जाईल असे आश्वासन सभागृहात दिले.

दारू पिणाऱ्यावर कारवाई

रत्नागिरी । प्रतिनिधी

जयगड येथे दारू पिण्यासाठी बसलेल्यावर पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई शुक्रवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जयहिंद पवार (रा.पेठवाडी) हा गणेशवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका झाडाच्या खाली दारू पित बसला होता. त्यानंतर तो हेलकावे खात जात असल्याने जयगड पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली. त्याच्यावर कलम ८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सोनुर्लीत रस्त्याची साईडपट्टी कोसळली

बांदा । वार्ताहर

पाडलोस-सोनुर्ली नवीन मार्गावरील पोटयेकुंभवाडी येथे मातीचा भराव घालून केलेल्या रस्त्याची साईडपट्टी कोसळली. तर बांधण्यात आलेली संरक्षक भिंत व रस्ता यामध्ये चर पडला आहे. त्यामुळे अपघात घडण्याची शक्यता असून संबंधित विभागाने याकडे लक्ष देत तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पाडलोस, सोनुर्ली भागात गेले आठ दिवस कोसळत असलेल्या सततच्या पावसामुळे पोटयेकुंभवाडी येथे २५ ते ३० फूट लांब साईडपट्टी कोसळून रस्त्याला धोका निर्माण झाला आहे. सदर रस्ता भराव टाकून करण्यात आला. काही अंतरावर संरक्षक भिंत उभारण्यात आली मात्र काही भागाकडे दुर्लक्ष करण्यात आले की निधी नव्हता असे ग्रामस्थांमधून बोलले जात आहे. रस्त्याच्या बाजूला पाच ते सहा फूट खोल सखल भाग निर्माण झाल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाहे. त्यामुळे संबंधित विभागाने याठिकाणी तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पोटयेकुंभवाडी येथील भौगोलिक परिस्थिती पाहता याठिकाणी पाण्याचा प्रवाह पावसाळ्यात मोठा असतो. त्यामुळे भराव घातलेल्या संपूर्ण रस्त्याच्या बाजूला संरक्षक भिंत उभारणे आवश्यक होते. मात्र अधिकाऱ्यांचे याकडे लक्ष गेले नाही की दुर्लक्ष झाले, असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.

नाथपंथी गोसावी समाज ऐक्यवर्धक, मंडळ, सिंधुदुर्ग (संचलित) प्राथमिक आश्रमशाळा बोर्डवे,

तालुका - कणकवली, जिल्हा - सिंधुदुर्ग.

पाहिजेत

नाथपंथी गोसावी समाज ऐक्यवर्धक, मंडळ, सिंधुदुर्ग (संचलित) प्राथमिक आश्रमशाळा बोर्डये, तालुका - कणकवली, जिल्हा - सिंधुदुर्ग. या प्रशालेतील वसतिगृह विभागात खालील रिक्त पद भरणे आहे. तरी पात्र, इच्छुक उमेदवारांनी दि. २१/०७/२०२४ रोजी रविवारी ११.३० वाजता प्रा. आश्रमशाळा बोर्डवे, ता. कणकवली येथे मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने मुलाखतीस उपिस्थित रहावे.

अ.क्रं.	पदनाम	शैक्षणिक पात्रता	एकुण पद
१	मदतनिस	७ वी पास	१

स्थळ - प्रा. आश्रमशाळा बोर्डवे, ता. कणकवली

सही/- मुख्याध्यापक
प्रा-आश्रमशाळा बोर्डवे,
मु.पो.बोर्डवे, ता.कणकवली

सही /- अध्यक्ष
ना.गो.स.ऐ.मंडळ सिंधुदुर्ग
मु.पो.बोर्डवे, ता. कणकवली

संपर्क - फो नं. ९४२०२०४४१७ / ९३७३७२२४९४/ ९८२३१७४९०७

थोडक्यात

झाड कोसळून कारचे नुकसान

रत्नागिरी । प्रतिनिधी

देवरुख शहरातील सोळजाई मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर दत्तमंदिराजवळ आज दुपारी झाड उन्मळून रस्त्यावर कोसळले. त्या रस्त्यावर उभी असणाऱ्या कारवर झाड कोसळल्याने गाडीचे नुकसान झाले आहे. माणिक चौक परिसरातील रस्त्यालगत असणारे जूने झाड दुपारी २.३० च्या दरम्याने उन्मळून पडले. याच झाडाखाली संजय शेडगे यांची स्विफ्ट डिझायर कार उभी होती. या गाडीवरच झाडा पडले. झाडाचा मुख्य भागच गाडीवर पडल्याने गाडीचे नुकसान झाले आहे.

किर्लोस आणि भगवंतगड बंधारा पाण्याखाली

मसूरे । वार्ताहर

शनिवारी रात्रीपासून अविश्रांत बरसणाऱ्या पावसाने धो डाला अशी परिस्थिती मसूरे पंचक्रोशी मध्ये निर्माण झाली आहे. गडनदी दुथडी भरून वाहत आहे. नदीकिनारी असलेल्या भात शेतीमध्ये पुन्हा एकदा पुराचे पाणी गेल्यामुळे लावणीची कामे खोळंबली आहेत. तसेच विजेचा लपंडाव सुद्धा चालू झाल्याने मसूरेतील बिएसएनएल मोबाइल नेटवर्क विस्कळीत झाले आहे. गड नदीपात्रावरील गोठणे आणि किर्लोस या दोन गावांना जोडणारा बंधारा पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक खोळंबली आहे. बांदिवडे आणि भगवंतगड जोडणारा कॉजवे सुद्धा पुराच्या पाण्यामुळे पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुद्धा बंद झाली आहे.

विहिरीतील पाण्यात बुडून मुलाचा मृत्यू

रत्नागिरी । प्रतिनिधी

शहरातील मुरुगवाडा येथील अल्पवयीन मुलगा विहिरीच्या पाण्यात बुडालेल्या स्थितीत सापडला. याबाबत शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आसिफ लतीफ शेख (रा. मुरुगवाडा, रत्नागिरी) असे मृत मुलाचे नाव आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास निदर्शनास आली. हा मुलगा खेळत असताना विहिरीच्या पाण्यात पडला. नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर त्याचा शोध घेतला असता तो विहिरीच्या पाण्यात बुडालेल्या अवस्थेत सापडला.

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम.बी.ए. (Distance) करिता प्रवेशाची सुवर्णसंधी

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता एम.बी.ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परिक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **गुरुवार, दि.१८ जुलै,२०२४** आहे.

फेर प्रवेश परीक्षा- रविवार, दि. २१ जुलै, २०२४

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन अथवा भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा ATMA तर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन (Management) विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेले आहेत ; अशा विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या 'एम.बी.ए. (Distance)' अभ्यासक्रमाला थेट प्रवेश घेण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. अशा पात्र विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे वरीलप्रमाणे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू नसेल याची नोंद घ्यावी. तरी सदरच्या प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा.

तसेच याबाबतची सविस्तर माहिती व सुचना https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx या संकेतस्थळावर पहावी.

फेर प्रवेश परीक्षेस अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा...

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : ०९/०७/२०२४
जा.क्र. सीडीओई/१०२३

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

थोडक्यात

नगरपंचायत सफाई कामगार गेले पंढरपुर वारीला !

कुडाळ । वार्ताहर

कुडाळ नगरपंचायत सफाई कामगार हे कुडाळ शहरातील स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेत असताना त्यांना सुध्दा विश्रांती म्हणुन देवदर्शन घडावे याच संकल्पनेतुन पंढरपूर, अक्कलकोट, शिर्डी, तुळजाभवानी असा देव दर्शन योग घडवुन आणत पंढरपूर वारीमध्ये सहभागी होतील ही संकल्पना महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी आमदार वैभव नाईक यांच्या कडे सांगुन सहकार्य करुन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक यांच्या संकल्पनेतून हे सफाई कामगार देवदर्शन घेऊ शकले आज या देवदर्शन सहलीचा शुभारंभ शिवसेनेचे अतुल बंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत उपनगराध्यक्ष किरण शिंदे यांनी श्रीफळ वाढवून केला,यावेळी नगरसेवक उदय मांजरेकर, विलास मुणगेकर, दीलीप कदम, सुनिता कुडाळकर, रमेश देवलकर, सतिश जाधव, राजन कदम, धोंडी बिबवणेकर, संतोष नेरूरकर, सुवर्णा जाधव,सुचिता जाधव, आरती धामापुरकर उपस्थित होते.

पेट्रोलपंप देतो सांगून केली आर्थिक फसवणूक

वेंगुर्ले । प्रतिनिधी

वेंगुर्ले तालुक्यातील आरवली-बांधवाडी येथे माहे २०२३ ते दि. २०/०५/२०२४ या मुदतीत अज्ञात आरोपीत याने तो इंडियन ऑईल कंपनीतून बोलत असल्याचे भासवून, फिर्यादी यांना पेट्रोलपंप सुरु करण्यासाठी इंडियन ऑईल कंपनीच्या बनावट मेलव्दारे आरवली येथील देवदत्त चव्हाण यांना बनावट कागदपत्रे व सर्टीफिकेटस देवून, त्यांचेकडून पेट्रोलपंप सुरु करण्यासाठी २,२८,०१८/- रुपये घेवून फसवणूक केली. याबाबतच्या आरवली येथील देवदत्त मंगेश चव्हाण यांनी वेंगुर्ले पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार भा.द.वि. कलम ४२०, आय. टी. क्ट क. ६६ (क), (ड)प्रमाणे अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास वेंगुर्ले पोलीस निरीक्षक संदीप भोसले करीत आहेत.

टेहाळणीसाठी ड्रोन कॅमेराला शासनाची मान्यता

मालवण । वार्ताहर

कोकण किनारपट्टीवरील अनधिकृत मासेमारीविरुद्ध ५ वर्षांपूर्वी महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाकडे याचिका केली गेली होती. ही याचिका स्वीकारताना आयोगाने पोलीस अधिक्षक - सिंधुदुर्ग व सहाय्यक आयुक्त मत्स्य विभाग (सिंधुदुर्ग) यांना प्रतिवादी केले होते. मत्स्य विभागाच्या गस्ती नौका या कालबाह्य झाल्या असून अंमलबजावणी कक्षात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो असा युक्तिवाद करण्यात आला होता, तसेच पारदर्शक कारभारासाठी टेहाळणीसाठी ड्रोन कॅमेराचा वापर करावा अशी मागणी केली होती. ही मागणी पूर्ण झाली असून ड्रोन कॅमेरासाठी मत्स्य विभागाने टेंडर जाहीर केले आहे.

खेड दापोली मार्ग बंद

दापोली । प्रतिनिधी

रत्नागिरीत अखिल जगबुडी नदीने धोका पातळी ओलांडली आहे. नारंगी व इतर नद्यांनी देखील आपली पातळी ओलांडली आहे. यामुळे खेड दापोली मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने म्हणजे कुंभारवाडा डेंटल कॉलेज या मार्गे वळवण्यात आली आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास खेड शहरात पुन्हा पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते. जुलै महिन्यात तब्बल दुसऱ्यांदा धोका पातळी देखील ओलांडली आहे. यामुळे शहरवासीयांच्या डोक्यावर पुराची टांगती तलवार कायम आहे.

सिंधुदुर्गात पेडांवरील गावरान चवीची अळंबी दाखल ; खवय्यांनी हातोहात खरेदीला गर्दी

कोकण कृषी विद्यापीठाने या नैसर्गिक अळंबीवर संशोधन करावे -भाई चव्हाण

कणकवली । प्रतिनिधी

कोकणातील गावरान मेव्यांची चलती ओसरताच आता अस्सल पेडांवरील गावरान अळंबी बाजारपेठांम ध्ये दाखल होऊ लागली आहेत. अस्सल खवय्ये या अळंबीचे वाटे हातोहात खरेदी करताना दिसत आहेत. येथील बाजारपेठेत ही अळंबी दाखल झाल्याचे समजताच अनेकांची पावले बाजारपेठेत वळतात. पण बर्यांच ग्राहकांच्या पदरी निराशाच आली, अशी माहिती आझाद हिंद शेतकरी संघटनेचे कोकण प्रदेश अध्यक्ष, पत्रकार गणपत तथा भाई चव्हाण यांनी दिली. कुत्रिमरित्या गवताच्या पेंढ्यावर तयार करण्यात येणारी अळंबी आणि नैसर्गिकरित्या मुंग्यांच्या वारुळांवर उगविणार्या अळंबी याच्या पोष्टिकतेची , चवीची तुलना करता ही अळंबी खूपच उत्तम आहेत. म्हणूनच गेली अनेक वर्षं कोकणवासिय या वारुळांवरील अळंबीवर कोकण कृषी विद्यापीठाने संशोधन करुन या अळंबीचे वाण विकसित करावे, अशी मागणी करीत आहेत. या विद्यापिठाने कोकणात नैसर्गिकरित्या उगविणार्या फागला या वेलवर्गीय पोष्टिक फळावर संशोधन करुन नविन वाण विकसित केला आहे. त्यामुळे ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांतील आदीवासींसह शेतकरीवर्ग माटवांवर फागलाचे बारमाही उत्पन्न घेत आहेत. गुजराती, मारवाडी आदी वर्ग रुपये ३०० च्या आसपास किलोचा दर असताना तिचा आहारात समावेश करतात. त्याचप्रमाणे या मातीवरील नैसर्गिक अळंबीवर संशोधन

करून बारमाही उत्पन्न घेता येईल असा नवीन वाण विकसित करावा. सामान्य ग्राहकांसह पंच तारांकित हॉटेल्समध्ये ही खास अळंबी रुपये १ हजार रुपये किलोपर्यंत विकली जातील.

अळंबीच्या पौष्टिक गुणधर्मा बाबत सर्वांनाच माहिती आहे. मात्र कोकणातील विशेषतः मुंग्यांच्या वारुळांवर नैसर्गिकरित्या पावसाळ्याच्या तोंडावर उगविणार्या अळंबीची चव मटणापेक्षा भारी आणि खासच असते. पौष्टिकतेच्या दृष्टीने ही अळंबी सरस असतात. कोकणात प्रामुख्याने तरवा लावणीच्या दरम्यान सर्वप्रथम ही अळंबी मुंग्यांच्या वारुळावर नैसर्गिकरित्या उगवतात. त्यानंतर नाग पंचमीच्या दरम्यान उगवतात. कोकणात या वारुळाला पेड म्हटले जाते.

गावांतील माहितीगार शेतकरी, विशेषतः धनगर समाजातील मंडळीना सालीना कोणत्या पेडांवर ही अळंबी उगवतात याची माहिती अवगत असते. सायंकाळी अळंबीच्या कळ्या हेरून दुसरे दिवशी पहाटेच वारुळांतून बाहेर पडलेली मोठ्या आकाराची अळंबी कोयता - कोयत्तीने कुशलतेने बाहेर काढतात.

काही वेळा ही अळंबी सायंकाळच्या वेळी उगवतात, संबंधित मंडळी ही अळंबी बाजारात आणताच या अळंबीचे माहितीगार भाजी विक्रेते अहमहमिकेने ती खरेदी करतात. रुपये २०० ते ३०० रुपयांचा वाटा लावून विक्री केली जाते. किलोच्या हिशोबाने विचार केला तर या अळंबीचा दर रुपये १००० ते १२०० च्या दरम्यान पडतो. तरी अस्सल खवय्ये हे वाटे हातोहात संपवितात.

अळंबीचा दोन्ही वेळचा हंगाम आठ दहा दिवसाचा असतो. धनगर समाजातील काही कुटुंबे तर या कालावधीत घाऊक विक्री करून सहज २५ ते ३० हजार रुपये कम वितात, अशी माहिती देऊन चव्हाण म्हणतात, या नैसर्गिक अळंबीवर संशोधन करून नविन वाण विकसित केला तर कोकणवासीयांना हमखास एक उत्पन्नाचे साधन निर्माण होईल.

माडाचे ओंडके टाकून प्रवास करण्याची आलीय वेळ

कुडाळ । वार्ताहर

कुडाळ तालुक्यातील पांग्रड गावामध्ये पिटढवळ नदीवरील निवहा कडील साकवाची पार दुरावस्था झाली असून या साकवावरून ये - जा करताना ग्रामस्थांना जीव मुठीत घ्यावा लागत आहे. साकवाच्या पलीकडे लोकांची वस्ती तसेच शेती आहे सध्या दिवसही पावसाचे आहेत अशा परिस्थितीत ग्रामस्थांना प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पर्याय म्हणून माडाचे ओंडके टाकून तारेवरची कसरत करावी लागत आहे. जवळपास २ वर्षांपासून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न असफल ठरत असल्याम ुळे ग्रामस्थानकडून तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त केला जात आहे.

या लोखंडी साकवाची पार दुरावस्था झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या साकवाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करून देखील संबंधित यंत्रणेकडून याकडे दुर्लक्ष केला जात आहे. या साकवावरून ये - जा करताना ग्रामस्थांना जीव मुठीत घ्यावा लागत असून एखादी दुर्घटना घडल्यास याला जबाबदार कोण ? असा सवाल ग्रामस्थांमधून उपस्थित केला जात आहे.

लोरे नं १ येथे कृषिदुतांकडून शेतकऱ्यांना रसायने व सेंद्रिय खातांचे प्रात्यक्षिक

फोंडाघाट । प्रतिनिधी

ब्राह्मणेश्वर शैक्षणिक व समाजिक मंडळ अंतर्गत,कै. राजाराम मराठे कृषिमहाविद्यालय फोंडाघाट येथील कृषीपदवीच्या अंतिम वर्षातील कृषिदुतांकडून ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत लोरे नं १ येथे कृषिदुतांकडून रसायने व सेंद्रिय खातांचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.

या मध्ये कृषिदुतांनी पसारण पद्धत, आळे पद्धत, फवारणी पद्धत, ठिबक पद्धत, इत्यादी पद्धतींची माहिती शेतकऱ्यांना दिली.जमिनीतून खते देण्याच्या पद्धतीमध्ये सेंद्रिय तसेच रासायनिक खते (नत्र,स्फूरद,पलाश)जमिनीत

मिसळून देतात, ही खते पाण्यात विरघळल्यानंतर पिकांस लागू पडतात, ही पद्धत जास्त प्रचलित आहे. सेंद्रिय खते (शेणखत, कंपोस्ट खत, गांडूळ खत इ.) पेरणीपूर्वी एक महिना अगोदर पसरण पद्धतीने देऊन शेवटच्या कुळवाच्या साह्याने मातीत मिसळतात. या प्रात्यक्षिकाम ध्ये अविनाश तोडकर,ओंकार शिरतोडे,विशाल गौराजे,श्रीराम कदम,रितेश पाटील,भरतकुमार पोला, प्रसंजित कामत या कृषीदुतांचा सहभाग आहे. यामध्ये प्राचार्य श्री संते सर, श्री मोटे सर व विषयतज्ञ श्री खांबल सर व प्रो ढोले मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

वैभववाडी बाजारपेठेत दुकानफोडी

वैभववाडी । प्रतिनिधी

वैभववाडी बाजारपेठेतील दोन दुकाने फोडून अज्ञात चोरट्यांनी दुकानातील सुट्टे पैसे लंपास केले आहेत. रविवारी पहाटे हा प्रकार घडला. या घटनेमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र दोन्ही दुकान चालकांनी या चोरीची तक्रार उशिरापर्यंत पोलीस ठाणेत दिली नाही.

शनिवारी रात्री सततधार पाऊस पडत होता. त्याचा फायदा घेत चोरट्यांनी बाजारपेठेतील जुन्या बस स्थानकासमोर असलेले साहिल मेडिकल स्टोअर्सच्या समोरच्या शटर चे कुलूप तोडून स्टोअर्स मध्ये प्रवेश केला. तसेच या मेडिकल स्टोअर्स शेजारी असलेल्या रामेश्वर बेकरीचे गल्ली

कडील बाजूच्या शटर चे कुलूप तोडून बेकरी मध्ये प्रवेश केला. दोन्ही दुकानातील इतर वस्तुंना चोरट्यानी हात न लावता दुकानातील केवळ सुट्टे पैसे व चिल्लर घेऊन पलायन केले.

मेडिकल स्टोअर्सचे चालक समीर मुरकर हे रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे स्टोअर्स उघडण्यासाठी आले असता त्यांना मुख्य शटरची दोन्ही कुलपे तोडलेल्या स्थितीत दिसून आली. याची माहिती त्यांनी वैभववाडी पोलिसांना दिली. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अवसरमोल, पोलीस हवालदार संदीप कांबळे, पोलीस नाईक धनाजी धडे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

त्यानंतर काही वेळातच रामेश्वर बेकरीचे कर्मचारी बेकरी उघडण्यासाठी आले असता बेकरीच्या गल्लीकडील बाजूचे शटरचे कुलूप तोडलेल्या स्थितीत मिळून आले. चोरट्याने हे शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे आतील सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून आले आहे. चोरट्याने आपला चेहरा पूर्णपणे झाकून घेतलेला दिसून येत आहे. तर त्याचा अन्य एक साथीदार तोडलेल्या शटरच्या बाहेरील बाजूस उभा असून त्याचे केवळ हात सीसीटीव्ही मध्ये दिसत आहेत.

या चोरीचा सर्व प्रकार पहाटे चार वाजता घडल्याचे सीसीटीव्ही मधून स्पष्ट होत आहे.

दरम्यान, या घटनेमुळे बाजारपेठेतील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या घटनेत चोरीस गेलेला माल किरकोळ असल्याने दोन्ही दुकान चालकांनी पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत तक्रार दिलेली नाही.

देवगड तालुक्यामध्ये मुसळधार वादळी वाऱ्यासह पावसाने नुकसान

देवगड । पांडूशेठ साटम

देवगड तालुक्यात शनिवारी रविवारी वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीने तालुक्यात हाहाकार माजला असून तालुक्यात ७७ मिमी पाऊस होऊन ठिकठिकाणी पडझडीच्या घटना घडल्या आहेत.शेतजमिनी माड बागायती, कॉजवे पाण्याखाली गेल्याने नुकसान झाले होते. तर तळवडे न्हावणकोंड धबधबा येथील मार्गावर दरड कोसळल्याने येथील वाहतूक बंद करण्यात आली होती. अतिवृष्टीने वाहतुकीचा वेग मंदावला होता तसेच जनजीवनही विस्कळित झाले होते . तालुक्यातील सौंदाळे हेदळेवाडी येथील सत्यवान राजाराम नार्वेकर यांच्या पिण्याच्या पाण्याची विहीर कोसळून सुमारे दोन लाख रुपये तर इतर ठिकाणी असे एकूण तालुक्यात सुमारे पावणेतीन लाखापर्यंत नुकसान झाले होते.

देवगड तालुक्यात शनिवारी रात्रीपासून रविवार दुपारपर्यंत झालेल्या अतिवृष्टी मुळे सौंदाळे हेळदेवाडी येथील सत्यवान राजाराम नार्वेकर यांची पिण्याच्या पाण्याची विहीर कोसळली व त्यामध्ये ३ विद्युत पंप चिऱ्याखाली गेल्याने सुमारे २ लाखाचे नुकसान झाले आहे. मणचे येथील महेश रामचंद्र घाडी यांच्या गोठयावर झाड पडून कौले फुडल्याने सुमारे २०,००० हजार,किंजवडेयेथील अरविंद बाळकृष्ण भोगलेयांच्या घराची पडवी कोसळून अंदाजे ३०,०००/- तर चे नुकसान झाले. जामसंडे कट्टा येथील रविंद्र भिमसेन करंगुटकर यांच्या पत्राशेडचे पत्रे उडून सुमारे ११०००/- रुपयाचे नुकसान झाले आहे.असे मिळून २ लाख ६१ हजार रुपयाचे नुकसान झाल्याची नोंद देवगड तहसील येथे करण्यात आले आहे.

वर्षा पर्यटनाचे आकर्षण असलेल्या तळवडे न्हावणकोडं येथील धबधबा ठिकाणी जाण्याच्या मार्गावर अतिवृष्टीने दरड कोसळून वाहतूक पूर्ण बंद झाली होती. तळवडे ग्रामपंचायत सरपंच रूमडे यांनी जेसीबी बोलावून दरड बाजूला करून तूर्तास्त रस्ता मोकळा केला. मात्र सुरक्षितेच्या दृष्टीने वाहतूक बंद ठेवण्यात आली होती.

महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंप? शरद पवार यांच्या भेटीसाठी भुजबळ सिल्वर ओकवर

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटल्यानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ शरद पवार यांच्या भेटीसाठी पवार यांच्या सिल्वर ओक या निवासस्थानी दाखल झाले आहे. भुजबळ सिल्वर ओकवर पोहचल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. भुजबळ-पवार यांच्या या भेटीमुळे राज्यात पुन्हा राजकीय भूकंप होणार का अशा चर्चा सुरू झाल्या आहे. दरम्यान भुजबळ शरद पवार यांना भेटायला गेल्यानंतर राजकीय वर्तुळात याची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली असून, सर्वच राजकीय पक्षांचे नेते यावर प्रतिक्रिया देत आहेत.

भेट कशासाठी?

बारामती येथे रविवारी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची सभा झाली. या सभेत बोलताना छगन भुजबळ यांनी शरद पवारांवर आरोप केले होते. ते म्हणाले होते की, बारामतीतून फोन गेल्यामुळे आरक्षणाच्या संदर्भातील सर्वपक्षिय बैठकीला विरोधी पक्षांचे नेते आले नाहीत. वास्तविक शरद पवार मोठे नेते आहेत. त्यामुळे त्यांनी सुद्धा या बैठकीला यायला हवे होते. दरम्यान छगन भुजबळ यांच्या या टीकेमुळे शरद पवार नाराज झाले आहेत. त्यामुळे भुजबळ त्यांच्या भेटीला गेल्याची माहिती साम टीव्हीला सूत्रांनी

दिली आहे.

भाजपची प्रतिक्रिया

पवार-भुजबळ यांच्या भेटीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शरद पवार आणि छगन भुजबळ यांच्यातील भेट

महाराष्ट्रात होत असलेल्या सामाजिक घडामोडींना अनुसरून असू शकते, आजच्या भेटीनंतर भुजबळ स्वतः सांगतील की त्यांनी पवार यांची भेट का घेतली.

छगन भुजबळ हे महायुतीचे मोठे नेते आहेत. त्यामुळे महायुतीला कोणत्याही प्रकारचे नुकसान होईल असे कुठलेही पाऊल उचलणार नाहीत शरद पवार यांची भेट घेणे यात काहीही गैर नाही. आम्हीही अनेकदा त्यांना भेटत असतो, त्यामुळे भुजबळ कोणताही निर्णय घेतील असे मला वाटत नाही, असेही बावनकुळे यावेळी म्हणाले.

महायुतीत भुजबळ नाराज?

महायुतीत सहभागी झाल्यापासून छगन भुजबळ नाराज असल्याच्या बातम्या सतत येत असतात. अशात लोकसभा निवडणुकीत नाशिकमधून लढण्यासाठी भुजबळ उत्सुक होते. पण शिंदे यांच्या शिवसेनेच्या आग्रहामुळे राष्ट्रवादीला ही जागा मिळाली नाही आणि त्यांची लकोसभा लढवण्याची संधी हुकली. अलिकडे राज्यासभेसाठीही भुजबळ उत्सुक होते. पण सुनेत्रा पवार यांचे नाव पुढे आल्याने भुजबळांची संधी हुकली होती. त्यामुळे भुजबळ अजित पवारांची साथ सोडणार अशा चर्चा सतत सुरू असतात.

कोकण रेल्वे सावंतवाडी टर्मिनससाठी आता ईमेल मोहीम

सावंतवाडी । प्रतिनिधी

कोकण रेल्वेमार्गावर सावंतवाडी येथे टर्मिनस होण्यासाठी कोकण रेल्वे प्रवासी सेवा समितीने आता हर घर ईमेल मोहीम हाती घेतली आहे. गेल्या २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी सावंतवाडी स्थानकात झालेल्या रेल्वे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या ईमेल मोहिमेला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा ईमेल मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. याबाबत कोकण रेल्वे प्रवासी सेवा समितीचे अध्यक्ष शांताराम नाईक यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, परिपूर्ण सावंतवाडी टर्मिनस का आवश्यक आहे, त्याचा प्रत्यय गोव्यातील पेडणे येथील बोगद्यात नुकत्याच साचलेल्या पाण्यामुळे आला आहे. एक दिवस वाहतूक बंद ठेवावी लागली. अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या, तर काही गाड्या दूरच्या अंतराने वळवाव्या लागल्या. त्या पार्श्वभूमीवर सावंतवाडी टर्मिनसचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. त्यामुळे अखंड कोकण रेल्वे प्रवासी सेवा समितीशी संलग्न असलेल्या २२ संघटनांच्या संयुक्त विद्यमाने कोकण रेल्वे प्रवासी संघटनने ईमेल मोहीम आखली आहे.

कोकणवासीयांनी आपल्या हक्कासाठी, सुखकर व निर्विघ्न प्रवासासाठी, भूमिपुत्रांच्या विकासासाठी कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेत तत्काळ विलीनीकरण व्हावे, सांवतवाडी येथे रेल्वे टर्मिनस व्हावे, केवळ कोकणासाठी नवीन गाड्या किंवा वाढीव थांबे मिळावे, या आपल्या मागण्यांसाठी रेल्वे प्रशासन, केंद्र सरकार आणि राज्य सरकारला जाग येण्यासाठी ईमेल पाठवायचे आहेत. त्याकरिता लिंक देण्यात आली आहे. या लिंकवर जाताच तो ईमेल रेल्वे मंत्री, रेल्वे राज्यमंत्री, रेल्वे बोर्ड, रेल्वे विभाग, कोकण रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक आणि महाराष्ट्र शासनाच्या मंत्र्यांनी पाठविले जाणार आहेत.

हजारोंच्या संख्येने कोकणवासीयांनी तसेच त्यांच्या सार्वजनिक मंडळांनी, सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांनी वैयक्तिकरीत्या ईमेल पाठवावेत, असे आवाहन श्री. नाईक यांनी केले आहे.

कोंडुऱ्यात वीजखांबासह रस्त्यावर झाड कोसळले

बांदा । वार्ताहर

शनिवार-रविवार दोन दिवस कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे कोंडुरा-दांडेली मार्गावरील कोंडुरा हायस्कूल जवळ रस्त्यावर भले मोठे झाड कोसळले. यावेळी एक वीजखांब व विद्युत ताराही जमीनदोस्त झाल्या. शाळेला सुट्टी असल्याने तसेच त्या दरम्यान येथून कोणतीही वाहतूक नसल्याने अनर्थ टळला. मात्र वीज खात्याचे नुकसान झाले.

गेले दोन दिवस सावंतवाडी तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. बांदा शिरोडा मार्गावरील दांडेली बनवाडी येथे अनेक बागायतींना पाण्याने वेढा घातला. तसेच तळवणे येथेही बागायतीत पुराचे पाणी शिरले. काही ठिकाणी लागवड केलेली झाडे उन्मळून पडली. तर दांडेलीत दोन ठिकाणी रस्त्यावर झाडे कोसळली. कोंडुरा तीठा येथे दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास वादळी पावसामुळे अकाशीयाचे मोठे झाड विद्युत वाहिनीसह रस्त्यावर कोसळले. यावेळी एक विद्युत खांब जमीनदोस्त झाला. ग्रामस्थांनी याची माहिती तत्काळ वीज वितरण विभागात देऊन पुरवठा खंडित करण्यास सांगितले. यावेळी येथून कोणतीही वाहतूक होत नसल्याने अनर्थ टळला. ग्रामस्थांनी मार्ग मोकळा केला.